रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०१५

टाइम्स

# दोडामार्ग महाविद्यालयात दीक्षांत समारंभ उत्साहात

## निसर्गाचा सन्मान करुन पर्यावरणाचा समतोल राखला तरच शिक्षणाचा हेतू साध्य होईलः प्रा. विजय फातर्फेकर

दोडामार्ग, ७ फेब्रुवारी (वार्ताहर)- पदवी हा एक शिक्षण प्रक्रियेतील छोटासा टप्पा असून शिक्षण हे आयुष्याच्या अंतापर्यंत घेतले तरी ते अपूर्ण आहे. शिक्षणाने बुध्दीमत्ता, ज्ञान वाढते. निसर्ग, पर्यावरण, झाडे-झुडपे, पशु-पक्षी यांचा आपण मानवतावादी दृष्टीतून विचार करतो का? याचे होकारार्थी उत्तर असेल तरच आपण सुशिक्षीत झाले असे म्हणता येईल. प्रत्येकाने निसर्गाचा सन्मान करायला शिकले पाहिजे. निसर्ग हाच विश्वाच्या केंद्रस्थांनी आहे. धरणी माता, पर्यावरण यांचा समतोल राखला तरच आपण जिवंत राहू शकतो, यांची जाणीव प्रत्येकाला झाली पाहीजे. अणु उर्जा ही आपली गरज नाही, त्यासाठी विजेचा कमीत कमी वापर केला पाहिजे. ३० टक्के कॅन्सर हा प्रधुषणकारी कारखाने, मोटारी यातून निघणाऱ्या विषारी वायुमुळे होते. कोणतेही काम करायला लाजू नका, श्रमिक संस्कृतीचा आदर करा, गोरगरीबांना मदत करा, त्यांना जाणून घ्या, एक आदर्श नागरिक बना. . तरच खऱ्या अर्थाने आपल्याला सुशिक्षीत म्हणाता येईल. असे प्रतिपादन ग्रंथालय व शैक्षणिक चळवळीतील कार्यकर्ते प्रा. विजय फातर्फेकर यांनी केले. ते येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात प्रथमच आयोजित केलेल्या दीक्षांत समारंभात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही.ए.पाटील होते. यावेळी संस्था सदस्य भाई परमेकर, नियामक समितीचे सदस्य विवेकानंद नाईक, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. दिलीप बर्वे उपस्थित होते.

प्रास्ताविक व स्वागत करताना प्राचार्य डॉ. पाटील यांनी मुंबई शहराच्या विकासाला ऐतिहासिक काळापासून कारणीभूत ठरलेल्या घटकांचे विवेचन करुन मुंबई शहर व मुंबई विद्यापीठाचा इतिहास कथन केला. विद्यापीठाचा पहिला दीक्षांत समारंभ १८६१ मध्ये झाला. त्यावेळी बी.ए. परीक्षेस बसलेल्या १० पैकी ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रथम श्रेणीतील उत्तीर्ण झालेल्या दोन विद्यार्थ्यांत नंतर न्यायाधीश व संस्कृत भाषेचे पंडित झालेल्या म.गो.रानडे यांचा समावेश असल्याची आठवण त्यांनी करुन दिली.

प्रारंभी स्वागतगीत, दीप प्रज्वलन व सरस्वती पूजन झाल्यानंतर प्राचार्य डॉ. पाटील यांनी पुष्पहार अर्पण करुन प्रमुख अतिथींचे स्वागत केले. यावेळी मुंबई विद्यापीठात झालेल्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या भाषणाची चित्रफीत दाखवण्यात आली. त्यानंतर प्रा. फातर्फेकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

शहनाईच्या मंजूळ स्वरात अतिशय प्रसंन्न अशा पातावरणात दोन तास रंगलेल्या या सुंदर कार्यक्रमाचा आंनद सर्वांनीच मनमुरादपणे घेतला. यावेळी तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी दीक्षांत समारंभासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत रांगोळी, फुलांच्या माळानी सभागुहाची सुंदर सजावट करुन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. एम.टी.बेग तर आभार प्रा. दिलीप बर्वे यांनी मानले.